# पठ्ठे बापूरावांच्या शोधात

चंद्रकुमार नलगे

अजब पब्लिकेशन्स्
भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर- ४१६ ०१२

▶ **पठ्ठे बापूरावांच्या शोधात : चंद्रकुमार नलगे**

▶ ©

**चंद्रकुमार नलगे**
चंद्रबन, साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर-४
(०२३१) २६७७०३४

▶ **प्रकाशक**
अजब पब्लिकेशन्स्
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.
मोबा. ९४२२४२१५०२

▶ **अक्षरजुळणी**
सचिन जाधव

▶ **मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

▶ **मुद्रक**
ॐकार मुद्रणालय
शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.
फोन : (०२३१) ३२०२५२६, २६५१८६४

▶ **आवृत्ती**
डिसेंबर २००९

▶ **किंमत**
रुपये ११०/-


प्रिय
**देवदत्त पाटील,**
पठ्ठे बापूरावांचा शोध
घेता घेता
काळजात एक वेदना
ठेवून गेलात...
हे अनंत दुःख
कसे सहन करायचे !
**चंद्रकुमार नलगे**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | परिंच्याकडे प्रयाण | ... | ७ |
| २. | पठ्ठे बापूराव कवी करी गं कलगी डफावरी | ... | १३ |
| ३. | पवळाच्या हिवरगावाकडे | ... | २९ |
| ४. | लाखो बायकांत खरी गं देखणी | ... | ४३ |
| ५. | सौंदर्य ओसरले आणि... | ... | ५१ |
| ६. | अखेर झोपडपट्टीत | ... | ६० |
| ७. | अस्वस्थ करणारा अंतकाळ | ... | ७० |
| ८. | एक जहाज बुडाले | ... | ७९ |
| ९. | जडता पिसे | ... | ९६ |


✦ ✦ ✦

# १. परिंच्याकडे प्रयाण

**रां**गड्या मराठी मनाला दोन गोष्टीचं मोठं वेड दिसतं. एक 'टाळांचं' आणि दुसरं 'चाळांचं.' टाळ म्हटलं की पंढरीची वारी आठवते आणि चाळ म्हटलं की तमाशाची बारी आठवते. भावनिक आणि मानसिक बरवेपणासाठी त्यांची अत्यंत गरज आहे.

माय मराठी मातीत<br>
गळा तुळशीचा माळ<br>
रंग सावळ्या रात्रीचा<br>
लळा पुरवितो चाळ.

तांबड्या मातीत रंगलेलं मराठी मन त्याला आवडलेल्या नवलाईत रमून जातं. वेडं होतं. त्याला कोणत्या गोष्टीचं पिसं लागेल ते सांगता येत नाही. एखादी गोष्ट आवडली की सारं झोकून देण्यात ते मागंपुढं पाहत नाही. स्वत:लाच पणाला लावून टाकतं. प्राणनिष्ठेनं झेपावत राहतं.

पंढरीची आषाढी वारी पाहावी. इतकी वेडी भक्ती त्रैलोक्यात आढळायची नाही.

वाट पंढरीची<br>
ज्ञाना तुकयाची

गोरा चोखयाची
ओढ लावी

ही त्या भक्तीच्या वाटेवर ओढ असते, तशीच ओढ एखाद्या प्रांजळ कलेच्या आविष्काराची असते. मराठी मातीचा असाच एक अस्सल वाण म्हणजे तमाशा. या कलेसाठी कैक वेडे झाले. अशांच पैकी एका वेड्या लोकशाहिराच्या शोधासाठी आम्ही वेडे झालो होतो. ज्यानं घरदार सोडलं, संसार मोडला, सामाजिक बंधनं झुगारून दिली, तमाशा या लोककलेच्या आराधनेसाठी वेडा फकीर बनला, त्या 'पठ्ठे बापूराव' या लोकशाहिराच्या जीवनाचा मागोवा घेण्यासाठी आम्हीही नवरात्राचा मुहूर्त साधून घर सोडलं. 'परदेश' धरला. 'पठ्ठे बापूराव कवी फैणा' त्याचा डंका चौमुलखी झाला होता. त्याच्या कवनाचे 'जडाव अति किमती.' ती जणू त्याची टांकसाळच होती. अशा 'पठ्ठे बापूराव कवीच्या मौजा, नित्य नव्या ताज्या' असायच्या. 'आजची लावणी उद्या म्हणायची नाही आणि शिळ्या पैशाचे तोंड पाहायचे नाही.' अशी ज्यांची दिमाखदार ऐट आणि ऐष होती, त्यांच्या 'चरित्र कहाणीच्या' शोधासाठी परमुलूख धरला होता. पठ्ठे बापूरावांच्या एका संगीत लावणीत त्यांनी म्हटले आहे,

सांगा तुम्ही कुठले हो राहणार।
सुरत छान सुकुमार छबिल्या।
इथून कुठे जाणार।
कंच्या कुळात जन्म झाला।
काय नाव ते सांगा आम्हाला।
अहो लग्न झाले का नाही अजुनी।
हौसी दिसता फार।

पठ्ठे बापुरावांनी म्हटल्याप्रमाणे खरेच तसे आम्ही हौसीच होतो. त्यांच्या बोलाप्रमाणे नाव-गाव तर सांगणं आलंच. नाहीतर त्यात ते आणखी 'खोडा' घालतील, तोडा विचारतील.

तसे आम्ही त्यांच्याच मुलखातले. प्रा. देवदत्त पाटील, श्री. पंढरीनाथ शेवाळे हे कृष्णाथडीचे. रेठरे हरणाक्ष या शिवथडीचे. मी तर पठ्ठे बापूरावांनीच लावणीच्या जडणीत सांगितल्याप्रमाणे,



मैत्रिणी स्वरूप चित्रिणी।
कोमल गात्रिणी।
बोल मागे फिरूनी।
गाव आमचे गं कोल्हापूर।
न करवीर शहर की पंचगंगेच्या संगमावर।
जरी पटका भगवा झेंडा।
खुणा त्या आमुच्या।

प्रा. देवदत्त पाटील हे प्रसिद्ध कादंबरीकार. पठ्ठे बापूरावांवर प्रेम करणारे. पंढरीनाथ शेवाळे म्हणजे नाव पंढरीनाथ; पण ते अनाथांचे नाथ. तमाशाचे छंदीफंदी. तमाशा कलावंतांवर काळीज देठापासून ममता बाळगणारे. त्यांचेही पठ्ठे बापूरावांवर अपरिमित प्रेम. पठ्ठे बापूराव व तमाशा कला आणि कलावंतांवर जे मिळेल, जे जे छापून येईल ते ते यांचा दुर्मिळ संग्रह त्यांनी केला आहे. लावणीतलं लावण्य हेरण्याची उच्च अभिरूची त्यांच्या ठायी वसली आहे. त्यांच्या प्रेरणेने व प्रा. देवदत्त पाटील, वि.द. कदम, प्रा. बी.जी. पाटील, एन.एस. क्षीरसागर, अरूण महाळुंगकर, विलास परदेशी, विश्वास धस यांच्या आगळ्यावेगळ्या जिव्हाळ्याने पठ्ठे बापूरावांची पुण्यतिथी महाराष्ट्रभर प्रथमच साजरी करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले. गेली कित्येक वर्षे हा कवनसोहळा इस्लामपुरात साजरा होतो.

त्यातूनच पठ्ठे बापूराव आणि त्यांची सुरेख सुंदर पवळा यांचा वावर जिथे जिथे झाला, तिथे तिथे भेटी देण्याचे ठरले. नवरात्राचा शुभकाळ त्यासाठी निवडला. प्रा. देवदत्त पाटील यांनी पठ्ठे बापूरावांवर कादंबरी लिहिण्याचा, प्रा. दीपक स्वामी यांनी संशोधन प्रबंध लिहिण्याचा व मी चरित्र लिहिण्याचा संकल्प सोडला होता. म्हणूनच आम्ही शेवाळे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्थान ठेवले होते. एखाद्या मोहिमेवर निघावे तसे आम्ही सर्व तयारीनिशी निघालो होतो. नाही तरी मराठी फौजा शिलंगणाच्या मुहूर्तावरच मुलूखगिरीला निघत. आम्हीही-

शब्दनगरीचे आम्ही सौदागर निघालो।
निघालो सफर कराया।
मोती पवळ्याचा व्यापार आमचा।
चाललो सोनं चांदी भराया।

आमच्या गाडीनं गावशीव सोडली आणि पठ्ठे बापूरावांची एक नटमोगरी लावणी आठवली,

गाडी आणावी भुरक्याची।
भुरक्याची दोन चाकी।

सारेच लावण्यांचे शौकीन. अस्सल मराठमोळा बाज. न आवडला तर तो रसिक कसला ! पठ्ठे बापूरावांच्या अनेक लावण्यांचे मुखडे आठवले. 'सभारंगी नाचत येणारा गण' आठवला. 'आतमधी कीर्तन, वरून तमाशा' अशी धाटणी ज्यानं पणाला लावली, तो लोकशाहीर म्हणतो,

श्रेष्ठ वर्ण मी ब्राह्मण असूनी।
सोवळं ठेवलं घालून घडी।
मशाल धरली हाती तमाशाची।
लाज लावली देशोधडी।

असं लोककलेचं पिसं जडलेल्या श्रेष्ठ लोकशाहिराच्या शोधात आम्ही चाललो होतो. गाडी धावत होती. डोक्यात पठ्ठे बापूरावांचे विचार दाटीने येत होते. काळीज अभिमानाने भरून गेले होते. बाहेरचा निसर्ग आमच्या भावभावनांना जपण्यासाठी लुभावणारी विविध रूपं घेऊन उभा होता. दोन दिवसापुर्वीच कोसळणाऱ्या पावसानं सारी सृष्टी लख्ख करून टाकली होती. टवटवीत बनली होती. आभाळातले निळे, पांढरे, सावळे ढग सावलीचे छत्र घेऊन उभे होते. हिरव्यागार रत्नपाचूच्या सौंदर्यानं नटलेलं चराचर आमची मनं फुलवीत होतं. अंधुक माहितीच्या आधारे आणि ऐकिवातल्या गोष्टी प्रमाण मानून काही लिहायचं नाही, हा मनाचा ताळा पक्का ठरला होता.

आधी परिंचे गावाला जायचं निश्चित केलं. हा गाव पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात आहे. ताई परिंचेकरांचा हा गाव; जिने पठ्ठे बापूरावांना पडत्या काळात आधार दिला. स्वत: मोलमजुरी करून पठ्ठे बापूरावांना सांभाळलं. ती नृत्यांगना होती. तमाशात तिनंही उभं आयुष्य घालविलं. तमाशासम्राज्ञी पवळा पठ्ठे बापूरावांना सोडून गेली, तेव्हा पठ्ठे बापूरावांनी एक नाचणारी बाई चंद्राला घेऊन नव्याने तमाशा उभा केला; पण पूर्वीचा उत्साह त्यात नव्हता. अखेर बापूरावांनी तमाशा मोडला. वृद्धापकाळ, हातात पैसा नाही, कुणी आधाराचं उरलं नाही, तेव्हा या ताईनंच त्यांना आधार दिला.



एका प्रतिभावंताला सांभाळणं तसं अवघड; पण ताईनं पठ्ठे बापूरावांच्या बुद्धिमतेवर प्रेम केलं होतं. त्यांच्या कलेवर प्रेम केलं होतं. ती त्यांच्याशी भक्तीनं वागत होती. ती बापूरावांना आपल्या परिंचे या गावी घेऊन गेली. तिथं कुडामेढीची झोपडी मारली. बापूरावांना आधार दिला. तिथंही निभाव लागेना म्हणून बापूरावांना घेऊन ती पुण्याला आली. येरवड्याच्या झोपडपट्टीत झोपडी मारली. बापूरावांना सांभाळण्यासाठी रोजगार करू लागली. दारिद्र्य, दैन्य, कंगाल झालेल्या अवस्थेत अखेरच्या क्षणापर्यंत ताईनं बापूरावांना सांभाळलं. एका थोर कलावंताच्या दुदैवी अंत:काळात तिनं आपलं दु:ख बाजूला ठेवलं. महाराष्ट्रातल्या मातीतली तमाशा कला तिची कायमची ऋणी राहील.

त्या ताई परिंचेकर हिच्या परिंचे गावी जाणं तर आमचं कर्तव्य होतं. दिवस परतला होता. सांज झाली होती. परिंचे गाव कुठं आहे कळत नव्हतं. शेवटी शिरवळला पोहोचलो. तिथल्या एस.टी. स्टँडवर चौकशी केली. त्यांनी परिंचे गाव कुठं आहे, मार्ग कोणते आहेत, ते मोठ्या आस्थेवाईकपणे सांगितले. पंढरपूर फाट्यावर आलो आणि अंधार सोबतीला घेऊन गाडी पळू लागली. रस्त्यावर चुकूनच माणूस भेटे. वीर धरणावर गेलं की परिंचे गाव लांब नव्हतं; पण रस्ता निर्मनुष्य. वाटमारीच्या अनेक गोष्टी ऐकलेल्या. तरीही 'मराठा गडी यशाचा धनी' म्हणत रात्री नऊ वाजता वीर गावाच्या धरण कॉलनीत पोहोचलो. रात्र वाढत चाललेली. अनोळखी, अंधारात बुडालेला मुलूख. कशाचाच नेमका अंदाज येत नव्हता. वीज खात्याच्या निवासस्थळावर गेलो. तिथं तर जागा शिल्लक नव्हती; पण तिथले कर्मचारी चांगले होते. त्यांनी मनापासून सहकार्य केलं. धरणावरच्या विश्रांतिगृहात फोन लावले. तिथंही जागा शिल्लक नसल्याचं कळलं. वाढत्या रात्रीचं आणि वेढत्या अंधाराचं भय दाटत गेलं. आमची स्थिती पाहून तिथल्या कर्मचाऱ्यांनी विश्रामधामाच्या साहेबांच्या घरी फोन जोडून दिला. ते फलटण इथे राहतात. ते कुठे तरी बाहेर गेले होते. त्यांच्या पत्नी सौ. शिंदे भेटल्या. त्या प्राध्यापिका होत्या, शिवाय फलटणच्या नगरसेविका होत्या. सामाजिक कार्यकर्त्या व प्राध्यापिका असल्याने आणि स्वत: कवयित्री असल्याने त्यांनी आमची अडचण समजून घेतली आणि धरणावरच्या विश्रामधामावर निवासाची सोयी केली. आम्हाला चढत्या रात्रीच्या अंधारात देव भेटल्याचा आनंद झाला. तिथं गेलो. रजिस्टर पाहिलं तर गेल्या चार दिवसांपासून कुणी निवास बुक केल्याची नोंद नव्हती. आजही नव्हती. साहेबांच्या माघारी कर्मचाऱ्यांचा विनानोंदीचा

गैरकारभार चालला होता. तात्पुरते आलेले गेल्यावरच आम्हाला आसरा मिळाला होता. तिथली व्यवस्था चांगली होती. जेवणही सुरेख, रुचकर होते. सारे वातावरण निवांत होते; पण 'रात्र काळी, घागर काळी' अशीच आमची स्थिती होती. वेड पठ्ठे बापूराव यांचं होतं.

सकाळी 'उठी उठी गोपाळा । उदयाचळी मित्र आला ।' अशी होनाजी बाळांची भूपाळी साखरझोपेतच आठवली आणि पठ्ठे बापूरावांची छक्कड,

करवीर कोल्हापूरचे मुशाफर ।
दूर जाणे आम्हाला।
माझा डंका वाजे अटकेला ।
तुझ्या गावामध्ये आलो वस्तीला ।
मुक्काम आज केला ।
लालबागेमध्ये तंबू ठोकला ।
गार आमराईला ।

ही अशी मनात घोळत लगबग उठलो. पाहतो तर खरंच आमराईत नसलो तरी सुंदर वनराईत मुक्काम झाल्याचा अपरिमित आनंद झाला. उंच, उंच हिरवीगार झाडे, ऋषिमुनींची आठवण करून देणारी मोठी मोठी दाट पारंब्यांची वडाची झाडे, उदयाचळावरच्या टेकडीवरील मंदिरात चाललेली आरती... भल्या प्रभातीचं वातावरण कसं पावित्र्यानं भरून गेल्यासारखं वाटलं. नीरा नदीवर बांधलेल्या धरणाच्या कुशीतच, बंधाऱ्याला बिलगूनच रात्री आम्ही रंगलेल्या स्वप्नांचा जागर अनुभवला होता. किती तरी मनमौजी होता.

✦✦✦



# २. पठ्ठे बापूराव कवी करी गं कलगी डफावरी

**वी**र धरणावर उभा राहिलो. सभोवती उंच उंच डोंगर, काळी, हिरवीगार शिवारं. नुकत्याच उगवतीच्या डोंगरावर उभ्या असलेल्या कोवळ्या सूर्यबिंबानं सर्व आकाश उजळून टाकलं. सोनेरी किरणांची प्रभा दूरवर पसरलेल्या अथांग, निळसर जळावर चमकत होती. मन उल्हसित करणारा तो सुंदर देखावा होता. तो पाण्याचा अथांग पसारा पाहून पठ्ठे बापूरावांची लावणी आठवली,

मैना पहाटेला राधाकृष्ण बोल ।
तुझे कोण करील जगात मोल ।
भवसिंधूचा मोठा भवरा ।
पाणी अपरंपार खोल ।
कैक पोहणारे बुडून मेले ।
नाही आवरला तोल ।

त्या अथांग पाण्याच्या पसाऱ्याने रानसीमा मोडून टाकल्या होत्या; पण ऐलपैल पसरलेल्या हिरवाईनं पिढ्यान्‌पिढ्यांच्या जिवाचं सोनं केलं होतं. माणसाच्या विलक्षण बुद्धीची चतुराई अनुभवत होतो. पेटत्या रानझळांच्या मुलखात आता हिरव्या राव्यांच्या

झुळका पोपटी गारवा देत होत्या. कैकांचे बुडणारे संसार या धरणाने तरले, तारले, नवी दुनिया फलफलून उभी केली.

पाय निघत नव्हता. हरवलेली नजर आवरता आवरत नव्हती; पण मन सावध होतं. ज्या चतुराईच्या शोधात आम्ही आमची मुलूखगिरी सुरू केली होती, त्या शोधात निघणं आवश्यक होतं. परिंचे गाठायची घाई होती; पण वीर या गावच्या 'श्रीनाथ म्हस्कोबा' देवाच्या सुंदर मंदिराने मोहात पाडलं. पुरंदरच्या केदारेश्वराजवळ उगम पावून या रम्य परिसरात खळखळत वाहणाऱ्या पूर्णगंगा नदीच्या काठावरचं या मंदिराचं दृश्य मोठं मनोहारी आहे. नवरात्रीत नऊ दिवस जणू इथं यात्रा भरल्यासारखी गर्दी असते. हा श्री क्षेत्र काशी खंडाचा राजा. काळभैरव. भक्तांसाठी इथं आला. म्हसणवाटात राहिला म्हणून म्हस्कोबा. धनगर समाजातील एका भक्ताच्या भक्तीला भाळून इथं आला. यानं काळभैरव असताना श्रीविष्णू व ब्रम्हदेव यांचा अहंकार हरविला होता. वेताळ, भुते, चामुंडा, महिषासुर या सर्वांचा अधिपती असला तरी भक्ताच्या भावभक्तीला पावतो, अशी त्याची ख्याती आहे. मी, प्रा. देवदत्त पाटील, श्री. पंढरीनाथ शेवाळे, प्रा. दीपक स्वामी मिळून त्या मंदिराच्या आवारात गेलो. आवार तर अत्यंत विलोभनीय वाटले. अंगणातच भले मोठे कासव कोरले होते. नवरात्राचा छबिना निघाला की, कोल्हाटी लोकांचं नाचगाणं त्या कासवावर होतं. देवाची सेवा करण्यासाठी अनेक गावाचे कोल्हाटी तमासगीर इथं हजेरी लावतात.

आम्ही गाभाऱ्यात गेलो तर तिथे तीनशे-चारशे समया प्रकाशमान केलेल्या दिसल्या. गाभाऱ्यातील ते दृश्य अत्यंत देखणे, मनोहारी होते. भक्तगण त्या समया लावतात. नवरात्र अखंड तेवत ठेवल्या जातात. एखादी विझली तर तो अपशकुन वाटतो. गाभाऱ्याची चौकट लहान असून चांदीच्या पत्र्याने मढविलेली आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूंनी लाकडी, जाडजूड अशी वस्तू अडकवून ठेवलेली दिसली. तिला 'मेकमोगरी' म्हणतात. वेगळ्याच आकाराचे, वळ्यावळ्यांचे, अडीच-तीन फूट लांबीचे अत्यंत वजनदार असे ते निराळे देवाचे शस्त्र होते. तिथेच बाजूला म्हस्कोबा देवाच्या विश्रांतीसाठी सजविलेली शय्या असून तिथं



गांजाची भरलेली चिलीम ठरावीक वेळेला पेटवून ठेवली जाते. पेटती गांजाची चिलीम ठेवली की कुणीही तिथे थांबायचे नसते. गाभाऱ्याचे दार एक तासभर बंद करून ठेवले जाते. मध्येच कोणी दार उघडले की अनेक वाईट घटना घडल्याच्या दंतकथा सांगितल्या जातात. देवराज एकांतात गांजा ओढतात, असा लोकांचा समज आहे.

आम्हांला आवडलेली गोष्ट म्हणजे छबिन्यानंतर जेव्हा तमाशाचे ताफे उभे राहतात, तेव्हा पठ्ठे बापूरावांचा गण म्हटला जातोच; पण अनेक लावण्या म्हटल्या जातात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्या पठ्ठे बापूरावांची ख्याती पसरलेली आहे, याचे प्रत्यंतर आले. याच भागात पठ्ठे बापूरावांच्या अखेरच्या आयुष्याचे वास्तव्य होते. त्यांच्या शोधाच्या अनावर ओढीने आम्ही श्रीनाथ म्हस्कोबाचा निरोप घेतला.

माळरानासारखी शेतीभाती, वारणा, कृष्णा खोऱ्यातील सुजलाम्, सुफलाम हिरवाईच्या मुलाखतल्या आमच्या नजरेला हा मुलूख थोडा कसनुसा वाटला. महाराष्ट्राच्या तमाशा या लोककलेला ज्यानं सभांगणी उजळ केलं, तो श्रेष्ठ युगकर्ता या मुलखात अखेरच्या काळात कसे तरी जीवन कंठायला आला होता.

पठ्ठे बापूरावांनीच स्वत:विषयी खडाखडी सांगून टाकलं होतं,

आम्ही दक्षिणचे सुभेदार ।
की कोल्हापुरी गं ।
नको करूस तंटा ।
जाईल घंटा दुरी गं ।

तर दुसऱ्या एका लावणीत आत्मविश्वासानं ते रोखठोक सांगतात,

पठ्ठे बापूराव कवीचा दरारा ।
चारी जिल्ह्यांत म्हाजूर सारा ।
झुरा बावरा, फंची मनसुरा ।
स्थिरा सारी करिती मुजरा ।

आणखी एका लावणीत आपल्या चतुराईबद्दल ते म्हणतात,

माझ्या मतीचा प्रकाश कैसा ।
बारा कळेचा सूर्य जैसा ।
भानू उगवला उत्तम खासा ।
अज्ञात अंधार पडला फडशा ।

तरीही ते विनयाने बोलता बोलता सत्य वास्तवाचा बोल करतात,

फंची पटाईत आम्ही कवीश्वर ।
अक्कल आहे माझी थोकडी।
परी मारली उडी मेरूवरूनी ।
एकाएकाहून एक चढी ।

असा हा शीघ्रकवी आपल्या मायभूमीबद्दल 'धान्याची लावणी'मध्ये सार्थ अभिमानाने गात राहतो,

पुण्यापासून कृष्णा थडीवरती
आहे महशूर चहू मुलखात
काळ्या जमिनीत पीक येते भारी ।
गहू, हरभरे, तांदूळ, मूग,
ज्वारी आणि तुरी
हिरवीगार बाजरी, करडी,
तीळ हावरी, मटकी पांढरी ।

अशा नानाविध पिकांचे वर्णन पठ्ठे बापूराव करतात आणि मग तोऱ्यात म्हणतात,

म्हणे पठ्ठे बापूराव कवी अशीची कर दुसरी ।
रेठरे, कृष्णा थडी गावं तिकडे तरी जावं ।
शिकवतील अज्ञात पोरी ।

इतका उदंड पिकांचा मुलूख जो वर्णन केला आहे, तो आम्हाला पटला. पठ्ठे बापूरावच म्हणतात, त्याप्रमाणे



पठ्ठे बापूरावचे हे निवाडे मला
पटले खरे रोकडे

अशा या दौलतीत जन्माला आलेले पठ्ठे बापूराव सांगतात,

विचित्र गती माझ्या दैवाची
कहानी भान माझा सारा उडे
अंतकाळी कठीण व्यथा ।
मग झाली व्याकूळ पुरता
पठ्ठे बापूराव कवीची ही गाथा
भागवताचा सारा काढला
भागवताची आण ।
भूलभुलैय्या 'मुंबईच्या लावणी'त ते म्हणतात,
खुद्द राहण्याचे ठिकाण कोल्हापूर
गड आमचा पन्हाळा ।
भगवा झेंडा खुणेशी लाविला
घ्या तुम्ही पडताळा ।
पठ्ठे बापूराव कवीची शाळा ।
इंग्रजी टंकशाळा ।

वैपुल्याने नटलेली अशी शब्दांची टंकशाळा त्यांच्या जिव्हाग्री नाचत असली तरी मतलबी व्यवहारातल्या चलनी नाण्यांच्या 'टांकसाळे'नं त्यांच्याकडे पाठ फिरविली होती. जिच्यासाठी त्यांनी 'अत्तराचे दिवे' जाळले, ती रुपरमणी पवळा सोडून गेल्यावर 'बिकट वाह वहिवाट' वाट्याला आली. तेव्हा ताई परिंचेकर जिवाच्या कळवळ्याने पुढे आली आणि तिने पठ्ठे बापूरावांना परिंचे गावी आणले. एकेकाळचा शब्दांचा तालेवार आणि वैभवाचे सम्राट असलेला बापूराव या मुलखात आला. त्यांच्याच या जीवन वाटचालीचा शोध घेण्यासाठी आम्ही परिंचे या गावी पोहोचलो.

गावाच्या बाहेर माळावर स्टँड. कुणाला काही विचारावं तर सारा उजाड माळ.

वारणा–कृष्णाकाठच्या भर हिरवाईनं रसरसलेल्या आमच्या नजरा तिथलं उघडंवागडं भकासपण पाहून थोड्या नाराज झाल्या. शहाण्यासुरत्या माणसाला विचारावं तर तसं कुणी भेटलंच नाही. अलीकडच्या पिढीला तर पठ्ठे बापूराव आणि ताई परिंचेकर यांची नावंच माहिती नव्हती. पारावरच सकाळी–सकाळी पेपरचा स्टॉल दिसला. कदाचित त्याला माहिती असेल म्हणून विचारलं, तर त्यानं सरळ सरळ काखा वर केल्या आणि आमच्याकडं दुर्लक्ष करून पेपरच्या हिशेबात गुंतला. आम्ही अडचणीत आलो. ताई परिंचेकरांचं घर कुठाय म्हणून विचारलं तर नसती आफत यायची ! पठ्ठे बापूरावांची लावणी आठवली,

तुम्हाला किती परी सांगावे ।
परनार कटू झ्यार
विष आहे अनिवार
व्यर्थची मुकाल ठार
मरण चुकवोनी असावे ।

म्हणून एक म्हतारा पानपट्टीवाला दिसला. त्याला आम्ही का व कशासाठी आलोय, ते समजावून सांगितलं. मग तो म्हणाला.

‘ते तमाशंवालं व्हय, हुंत इथं, ताईला म्या पाहिलीय. त्या पल्याड आंब्याच्या झाडाखाली बसायची. आम्ही ल्हान हुतो तवा. आसंच वढ्याच्या पल्याड जावा. तिथं भीमनगर हाय. तिथंच विचारा.’

उगवतीच्या बाजूला निघालो. थोडासा धीर आला होता; पण पूर्णपणे माहिती लागेल याचा विश्वास लागत नव्हता. पठ्ठे बापूरावांच्या शोधात कालपासून धावत होतो. पठ्ठे बापूरावांच्या गाजलेल्या ‘मिठराणी’ या वगातली गोष्ट आठवली. ‘मिठराणी’ या राजकन्येच्या ‘नर आधी का नार आधी ?’ अशा प्रश्नाला उत्तर देणाऱ्या राजपुत्राला मिठराणी माळ घालते; पण प्रवासात जाताना एका धर्मशाळेत दोघांची ताटातूट होते. दोघेही बैरागी होऊन एकमेकाला शोधायला निघतात. त्यांच्यासारखेच कविश्रेष्ठ बापूराव आमच्या शिवधडीचे गडी; पण तमाशाच्या नादात कुठे कुठे झुकले ते पाहण्यासाठी आम्ही घरदार सोडलं होतं.



उत्तर खंडी गौडबंगाला ।
धुंडून पाहिला सारा गे
सांगा सहेल्यांनो
सखासजणाचा कुणीकडे
लागेल थारा गे ।
करवीर, कोल्हापूर।
धुंडिलं सारं –पंचगंगा
नदी मोठी गे ।
गर गर गर गर हिंडुनी
मैना सख्या सजणाच्या पाठी गे
कृष्णा कोयनेचा संगम झाला
कऱ्हाड त्याच्या काठी गे
अजिम तारा, गड सातारा
खरी मराठी घाटी गे ।

मिठराणीप्रमाणे आम्ही हा सारा बळीवंत मुलूख पाहून इथे आलो होतो. तुरळक कसली तरी झुडपं, लिंबाची उनाडी झाडं, कुठं चिंच उभी तर कुठं वडाचं झाड, उन्हाला आसरा देण्यासाठी तिष्ठत राहणारं. आडवा आलेला छोटासा ओढा ओलांडला. ‘रुद्रगंगा’ हे त्याचे नाव. नावाप्रमाणे तो रुद्रही नव्हता आणि नदीसारखा गंगाही नव्हता, पण महाराष्ट्राच्या तमाशा कलेचा महारुद्र इथे वास्तव्याला होता हेच याचे परमभाग्य. त्या रुद्रगंगेकडे आम्ही पाणावलेल्या डोळ्यांनी पाहिलं आणि त्या श्रीधराच्या छंदीफंदीपणाची परिसीमा आठवली.

रुद्रगंगेला ओलांडून गेल्यावर एक दूकान लागलं. तिथल्या पन्नाशी–साठी उलटलेल्या दुकानादाराला ‘पठ्ठे बापूरावां’बद्दल विचारलं, तर त्यानं ‘आम्ही तसल्या पंच्यातीत नसतो’ असं सांगितलं. आम्हाला बापूरावांच्या ओळी आठवल्या

नको लावून बोलण्याची भरळी ।
माझ्या दारातनं उठ येरवाळी ।